क्रमांक:- एपिटी-२००४/प्र.क्र.२२६४/आस्था-८
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई:- ४०० ०३२
दिनांक:-५ फेब्रुवारी, २००४

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

विषय:- सुधारित आकृतिबंधाप्रमाणे विस्तार अधिकारी (प./स. क) पदे मंजूर करण्याबाबत

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांसाठी दिनांक २७ जून ०३ च्या शासन निर्णयान्वये सुधारित आकृतिबंध मंजूर केला आहे. त्यामध्ये ३० ते ४० ग्रामपंचायतींसाठी १ विस्तार अधिकारी हे पद मंजूर केले आहे तथापि काही जिल्हा परिषदांमध्ये विस्तार अधिकारी या संवर्गातील मंजूर पदांची संख्या कमी असल्यामुळे ते सुधारित आकृतिबंधाप्रमाणे विस्तार अधिकारी यांची अतिरिक्त पदे मंजूर करून देण्याबाबतची विनंती शासनाकडे करतात. तरी त्या संदर्भात आपणास असे कळविण्यात येते की सुधारित आकृतिबंधाप्रमाणे ३० ते ४० ग्राम पंचायतींसाठी १ विस्तार अधिकारी हे पद अनुज्ञेय आहे. सर्वसाधारणपणे सरासरी नुसार ३५ ग्रामपंचायतींसाठी १ विस्तार अधिकारी या प्रमाणात विस्तार अधिकारी यांची पदे भरण्यास हरकत नाही. मात्र सदरहू पदे भरताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार पदे भरण्याची कार्यवाही करावी.

(ज. म. अडकमोल)
अवर सचिव महाराष्ट्र शासन

CR-2624 4.2.04/C/M7/AST-08

Scanned by CamScanner